# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २९/०१/२०१६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २९/०१/२०१६ रोजी सभा सुचना क्र. १७ दि. २२/०१/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हरिश्चंद्र आंमगावकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | मा. सभापती |
| २. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सदस्य |
| ३. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| ६. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ७. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| ८. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. दिनेश तेजराज जैन | सदस्य |
| ११. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| १२. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १३. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १४. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १५. | ॲड रवि व्यास | सदस्य |

गैरहजर सदस्य –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |

मा. सभापती :-

आजच्या सभेसाठी सर्वाचे स्वागत, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणारत पार पाडण्यात यावी. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २९/०१/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १७, दि. २२/०१/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १३२, दि. ३०/०९/२०१५ व दि. १४/१०/२०१५ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

जयंतीलाल पाटील :-

दि. ३०/०९/२०१५ व दि. १४/१०/२०१५ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

मोहन जाधव :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १३२ :-

दि. ३०/०९/२०१५ व दि. १४/१०/२०१५ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १२७ :-

दि. ३०/०९/२०१५ व दि. १४/१०/२०१५ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. जयंतीलाल पाटील     अनुमोदन:- श्री. मोहन जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १३३, परिवहन उपक्रमा अंतर्गत नव्याने तयार करण्यात येत असलेल्या बस पार्कींग स्थळा ठिकाणी विविध सोयीसुविधा तयार करणे कामाबाबत.

प्रशांत केळुसकर :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमांतर्गत बस पार्कींग साठी चार ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. सदर ठिकाणी पार्कींगसाठी खडीकरण व ग्राऊटींग करुन जागा समतल करण्यात आली आहे. तथापी बस पार्कींगच्या अनुशंगाने खालील कामे तातडीने करण्याबाबत मा. परिवहन व्यवस्थापक, परीवहन उपक्रम यांनी प्रत्यक्ष सुचना दिल्या आहेत. सदर सुचनेनूसार खालील कामे तातडीने करावयाची असून खालीलप्रमाणे अंदाजपत्रक बनविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.३५४ बस पार्कींग ठिकाणी सुरक्षेसाठी कुंपणभिंत बांधून गेट बसविणे. | रू.३९,६८,७००/- |
| २ | बस दुरुस्तीसाठी पिट बांधणे व त्यावर शेड बांधणे. | रू.४५,३७,२००/- |

परिवहन उपक्रमाच्या अंदाजपत्रकात तातपुरत्या पार्कींग साईट्स विकसित करणेकरीता अंदाजपत्रकीय तरतुद उपलब्ध आहे.

तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १३३ :-

परिवहन उपक्रमा अंतर्गत नव्याने तयार करण्यात येत असलेल्या बस पार्कींग स्थळा ठिकाणी विविध सोयीसुविधा तयार करणे कामाबाबत.

ठराव क्र. १२८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमांतर्गत बस पार्कींग साठी चार ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. सदर ठिकाणी पार्कींगसाठी खडीकरण व ग्राऊटींग करुन जागा समतल करण्यात आली आहे. तथापी बस पार्कींगच्या अनुशंगाने खालील कामे तातडीने करण्याबाबत मा. परिवहन व्यवस्थापक, परीवहन उपक्रम यांनी प्रत्यक्ष सुचना दिल्या आहेत. सदर सुचनेनूसार खालील कामे तातडीने करावयाची असून खालीलप्रमाणे अंदाजपत्रक बनविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.३५४ बस पार्कींग ठिकाणी सुरक्षेसाठी कुंपणभिंत बांधून गेट बसविणे. | रू.३९,६८,७००/- |
| २ | बस दुरुस्तीसाठी पिट बांधणे व त्यावर शेड बांधणे. | रू.४५,३७,२००/- |

परिवहन उपक्रमाच्या अंदाजपत्रकात तातपुरत्या पार्कींग साईट्स विकसित करणेकरीता अंदाजपत्रकीय तरतुद उपलब्ध आहे.

तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर          अनुमोदन:- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १३४, भाईंदर (पू.) जेसलपार्क चौपाटीवरील विधी शेड नाममात्र भाड्याने देणेबाबत.

सुहास रकवी :-

साहेब ह्या विषयाचा गोषवारा दिला नाही.

मर्लिन डिसा :-

एकाच विषयाचा गोषवारा दिला बाकी दिले नाही.

मा. सभापती :-

गोषवारा दिला नाही दशक्रिया विधीचा त्यासाठी आता आपण महानगरपालिकेच्या माध्यमातून बांधले होते.

स्टिवन मेन्डोन्सा :-

मंजूरी घ्यायची आहे ना.

सुहास रकवी :-

तो भाडयाने द्यायचा आहे.

मा. सभापती :-

भाडयाने नाही.

सुहास रकवी :-

विषय आहे. नाममात्र भाडयने देण्याबाबत.............

मा. सभापती :-

दशक्रिया विधीला ते भाडयाने देतात महानगरपालिकेच्या माध्यमातूनच आपण देतो. महानगरपालिकेच्या माध्यमातून झाल्यावर तिथे नळ कनेक्शन वैगेरे सगळे चोरीला गेले होते. त्यामुळे ते संस्थेच्या ताब्यात चालवण्यासाठी द्यायचे होते.

सुहास रकवी :-

साहेब द्यायला आमची ना नाही पण रितसर माहित तर पाहिजे.

शरद पाटील :-

मा. सभापतीसाहेब दशक्रिया विधी ही जी शेड आहे त्याचे महानगरपालिकेला भाडे पाहिजे का? तिथे दीड लाखाची..................

मा. सभापती :-

भाड्यावर द्यायचे नाही म्हणून आपण असे करतो. संस्थेच्या माध्यमात राहिले तर सुरक्षा राहील ना.

सुहास रकवी :-

संस्थेला देणार तर तुम्ही विषय कसा आणला आहे नाममात्र भाडयाने देण्याबाबत................

मा. सभापती :-

विषय मीच आणला आहे.

सुहास रकवी:-

आम्हाला ना नाही पण कितीने देणार. नाममात्र भाडे मग किती आम्हाला रेडी रेक्नरप्रमाणे आमच्या इथे हॉल घ्यायचा आहे. तर त्याचासुध्दा आम्ही हाच उपयोग करणार आहोत. लोकांच्या सोयीसाठी उपयोग करतो.

शरद पाटील :-

देखभाली करता द्या ना.

सुहास रकवी :-

मा. सभापतीसाहेब हे कोणत्या संस्थेचे पत्र आहे.

मा. सभापती :-

आगरी उन्नतीचे मी लेटर देतो.

सुहास रकवी :-

ठिक आहे.

शरद पाटील :-

गावक-याचेच आहे ना.

वेंचर मेंन्डोन्सा :-

गावचे असतील तर मी मान्य करतो.

मा. सभापती :-

आगरी उन्नती संस्था आहे. त्याची देखभाल ती लोक करणार आहेत.

(सभागृहात गोधंळ)

मोहन जाधव :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत तत्कालिन नगरपरीषद असताना विधी शेड बांधण्यात आली होती. सदर विधी शेडची देखभाल आगरी समाज उन्नती संस्थामार्फत व्यवस्थितरीत्या करण्यात येत होती. तथापी सदर समाजमंदिराची दुरावस्था झाल्याने सदर विधी शेडची पुर्नःबांधणी करण्यात आली आहे. सदर विधी शेडच्या देखभालीसाठी आगरी समाज उन्नती संस्थेने मागणी केली आहे. सदर विधी शेडचा वापर व देखभाल

व्यवस्थितरीत्या होण्यासाठी सदर संस्थेस करारनामा करून रु.१००/- प्रति वर्ष या सवलतीच्या दराने दिल्यास सदर वस्तूची देखभाल होऊन नागरीकांना त्यांच्या कार्यासाठी उपयोग होईल. सदर विधी शेड पासून कोणत्याही प्रकारे उत्पन्न नसल्याने सदर शेड देखभालीसाठी आगरी समाज उन्नती संस्था यांना ११ वर्ष मुदतीसाठी देण्यास व सदर शेडची दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यास वीजबील, पाणी बील महानगरपालिकेमार्फत भरण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

सुहास रकवी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

सुहास रकवी :-

आम्हाला आणखी एक सुचना करयची आहे. जसे भाईदर इस्टला आहे तसे वेस्टला भाईदर चौपाटीवर मोठया प्रमाणात लोक येतात. छटपूजा होते तसे इथेसुध्दा विधी होतात सर्व प्रकारची विधी होतात. पूजा असतात बालकांच्या पूजा असतात तिथेसुध्दा थोडासा निधी व काही सुधारणा केली तर बरे होईल. खांबितसाहेब फक्त रेल्वेचा प्रश्न आहे.

प्रकरण क्र. १३४ :-

भाईंदर (पू.) जेसलपार्क चौपाटीवरील विधी शेड नाममात्र भाड्याने देणेबाबत.

ठराव क्र. १२९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत तत्कालिन नगरपरीषद असताना विधी शेड बांधण्यात आली होती. सदर विधी शेडची देखभाल आगरी समाज उन्नती संस्थामार्फत व्यवस्थितरीत्या करण्यात येत होती. तथापी सदर समाजमंदिराची दुरावस्था झाल्याने सदर विधी शेडची पुर्नःबांधणी करण्यात आली आहे. सदर विधी शेडच्या देखभालीसाठी आगरी समाज उन्नती संस्थेने मागणी केली आहे. सदर विधी शेडचा वापर व देखभाल व्यवस्थितरीत्या होण्यासाठी सदर संस्थेस करारनामा करून रु.१००/- प्रति वर्ष या सवलतीच्या दराने दिल्यास सदर वस्तूची देखभाल होऊन नागरीकांना त्यांच्या कार्यासाठी उपयोग होईल. सदर विधी शेड पासून कोणत्याही प्रकारे उत्पन्न नसल्याने सदर शेड देखभालीसाठी आगरी समाज उन्नती संस्था यांना ११ वर्ष मुदतीसाठी देण्यास व सदर शेडची दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यास वीजबील, पाणी बील महानगरपालिकेमार्फत भरण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. मोहन जाधव अनुमोदनः- श्री. सुहास रकवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १३५, वाहन भत्त्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

प्रशांत केळुसकर :-

महानगरपालिकेच्या जे पदाधिकारी / अधिकारी स्वतःचे वाहन वापरतात त्यांना महापालिका रु. २० हजार, रु. १५ हजार असा वाहन भत्ता दिला जातो. त्यामध्ये वाहन चालकाचा पगार, डिझेल, पेट्रोल, स्वतःची गाडी या सर्व बाबी अंतर्भूत आहेत. मात्र जे अधिकारी महापालिकेचे वाहन वापरतात किंवा ठेक्यामधले वाहन वापरतात त्यांना महानगरपालिकेचे वाहन, महापालिकेचा वाहन चालक, डिझेल, पेट्रोल व इतर या बाबींचा विचार करता ४० ते ४५ हजार रु. खर्च होतो. दोन्ही भत्त्याची तुलना केली असता स्वतःचे वाहन वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांना / पदाधिकाऱ्यांना कमी भत्ता मिळतो. सदरचा भत्ता गेली १० वर्षापूर्वीचा असून त्यामध्ये डिझेल, पेट्रोल दरात वाढ झालेली आहे. वाहन चालकाच्या पगारात देखील वाढ झालेली आहे. या बाबीचा विचार करता त्यांना देण्यात येणारा भत्ता फार कमी आहे. दरवाढीचा विचार करता पदाधिकाऱ्यांना ३० हजार रुपये व अधिकाऱ्यांना २० हजार रुपये वाहन भत्ता देण्यात यावा तसेच ज्या अधिकाऱ्यांना देय भत्ता आहे त्यांना १० हजार रुपये भत्ता देण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

मुन्ना सिंग :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. सदस्यांना कोणत्या अधिका-या संबधात बोलायचे असेल तर बोला.

प्रकरण क्र. १३५ :-

वाहन भत्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. १३० :-

महानगरपालिकेच्या जे पदाधिकारी / अधिकारी स्वतःचे वाहन वापरतात त्यांना महापालिका रु. २० हजार, रु. १५ हजार असा वाहन भत्ता दिला जातो. त्यामध्ये वाहन चालकाचा पगार, डिझेल, पेट्रोल, स्वतःची गाडी या सर्व बाबी अंतर्भूत आहेत. मात्र जे अधिकारी महापालिकेचे वाहन वापरतात किंवा ठेक्यामधले वाहन वापरतात त्यांना महानगरपालिकेचे वाहन, महापालिकेचा वाहन चालक, डिझेल, पेट्रोल व इतर या बाबींचा विचार करता ४० ते ४५ हजार रु. खर्च होतो. दोन्ही भत्त्याची तुलना केली असता स्वतःचे वाहन वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांना / पदाधिकाऱ्यांना कमी भत्ता मिळतो. सदरचा भत्ता गेली १० वर्षापूर्वीचा असून त्यामध्ये डिझेल, पेट्रोल दरात वाढ झालेली आहे. वाहन चालकाच्या पगारात देखील वाढ झालेली आहे. या बाबीचा विचार करता त्यांना देण्यात येणारा भत्ता फार कमी आहे. दरवाढीचा विचार करता पदाधिकाऱ्यांना ३० हजार रुपये व अधिकाऱ्यांना २० हजार रुपये वाहन भत्ता देण्यात यावा तसेच ज्या अधिकाऱ्यांना देय भत्ता आहे त्यांना १० हजार रुपये भत्ता देण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदनः- श्री. मुन्ना सिंग

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

सुहास रकवी :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, गेल्यावेळेला मूर्ध्याला विषय निघालेला जो आपण राईच्या ग्राऊन्डला आमदार निधी देणार होतो त्यानंतर मूर्ध्याला जे समाज मंदिर आहे तिकडच्या स्थानिक मंडळाला देणार असे मी तुम्हाला गेल्यावेळला तोंडी सांगितले, लेखी दिले नाही पण आमच्याकडे पण वास्तू आहेत ज्या महानगरपालिकेच्या आहेत त्यासुध्दा नाममात्र भाडयावर आहेत. ज्या संस्था इकडच्या लोकल आहेत काम करतात त्याच्यात सर्व लोक समाविष्ठ आहेत अशा संस्थेला किंवा मंडळाला तुम्ही भाडयाने द्यावे ही विनंती.

मा. सभापती :-

खांबित साहेब असे कोणाला देता येईल का?

दिपक खांबित :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, अशा ब-याच मालमत्ता आहे ज्या भाडयाने देण्यासाठी मागणी आली आहे. पण आपल्या कायदयानुसार चालू बाजार भावापेक्षा कमी भाडे आपल्याला चालत नाही त्याकरिता ज्या-ज्या अशा प्रॉपटर्या आहेत ना त्या महासभेपूढे आणतो. महासभेचा ठराव घेऊ आणि शासनाकडे पाठवून शासनाच्या मान्यतेने प्रॉपर्टी देऊ या. म्हणजे आपले काय प्रॉब्लेम आहेत ते शासनाला सांगू.

सुहास रकवी :-

तत्पूर्वी ध्रुवकिशोर पाटील आणि जुबेर इनामदार ह्यांनी एक ठराव केला होता त्यांनी सांगितल्याप्रमाणे ह्या ज्या आपण देतो त्यांची मुदतवाढदेखील त्यामध्ये होती. त्या देऊन टाका कारण पानपट्टे साहेबांनी सांगितले डम्पींग ग्राऊंडचा ६ लाख रुपये महिना येणार ते काही आलेच नाही. ती वास्तू तशीच भाड्याने दिले का? सगळी जी टेंडर आहेत तुम्ही जो रेडी रेक्नरचा रेट ठेवता त्याप्रमाणे कोणतीही संस्था इंटरेस्ट नसते. ती वास्तू परत रिपेरिंग करायला दोन वर्षात खर्च बघितला तो भरपूर खर्च झाला. त्यासाठी एक निर्णय घ्या.

दिपक खांबित :-

महासभेत एक विषय आणून ठराव करु.

सुहास रकवी :-

ह्या ह्याच्यात आणला तरी चालेल.

दिपक खांबित :-

पुढच्या मिटींगला विषय देतो.

मर्लिन डिसा :-

मा. सभापती साहेब, मला एक प्रश्न विचारायचा आहे. गेल्या ८ वर्षापासून शितलनगरमध्ये ले आऊटमध्ये प्रायव्हेट आर.जी. प्लॉट आहेत. ७२९-७३२-७३३ ७३२ मध्ये गेल्यावेळी शिवमूर्ती नाईक साहेबांनी अर्धा प्लॉट डेव्हलप करुन दिलेले. बाकी अर्धा प्लॉट माती भराव करुन साफसफाई केला होता. परत आता गाबेज सारख झालेल आहे. ह्यावर्षी कमिशनर साहेबांनी विकासकाची हेअरिंग केली होती. त्यावेळी घेवारे साहेब पण होते. दोन महिन्याचे टाईम दिले होते. पण प्रत्येक वेळेला तो विकासक बोलतो की आर.जी. प्लॉट डेव्हलप केलेला आहे. मंदिराजवळ ७३३ आहे. तेथे बॅरीकेट लावून कोणाला जायला देत नाही. तिकडे फक्त नवरात्री

होते. तिथे २६-२७ वर्षांपासून रहिवासी राहतात. त्यांचा हक्क आहे. पण तो विकासक कोणाला पण एन्ट्री करुन देत नाही. फक्त कर्मशियल यूज करतो आणि संपवून टाकतो. दोन महिने संपत आले फक्त दोन दिवस बाकी आहेत. त्यांनी जर नाही केले तर माझी विनंती आहे. त्याच्याकडून महानगरपालिकेने हस्तांतर करुन घ्यावे आणि लोकांसाठी डेव्हलप करुन द्यावे जसे ७३२ केलेले आहे तसे ७३३ डेव्हलप करुन मूल खेळायला जागा मागवतात तर शितलनगरमध्ये खेळायला जागा नाही. ते फक्त जॉगिंग ट्रॅक्स झालेले आहे. दुसरी त्यांना जागा नाही.

मा. सभापती :-

घेवारे साहेबांना बोलवून त्याची माहिती घेऊ.

मर्लिन डिसा :-

दुसरा एक विषय आहे त्याच आर.जी. प्लॉटमध्ये रस्त्याला लागून स्नेहांजली शोरुमच्या बाजूला सर्व्हिस स्टेशन उघडले आहे. पूर्ण एकदम रस्त्यापर्यंत आलेले आहे. कम्पलिट इलिगल. बाजूचे सोसायटीवाले मोर्चा घेऊन यायला रेडी आहेत. तिथे जे सर्व्हिस स्टेशन जे आहे ते केमीकल स्प्रेईंग घेताना लोकांना त्रास होतो. त्यांची जी ठाकठोक चालु असते त्याचा आवाज येतो. कोणी आजारी असेल तर दुपारच्या वेळेला आराम नाही. मूलांना अभ्यास करण्याचा प्रॉब्लेम होतो. त्यांना किती तरी त्रास आहेत. तरी तो बिल्डर तेथून सर्व्हिस स्टेशन हटवत नाही. पत्रव्यवहार करुन आपल्या पालिकेने काही ॲक्शन घेतली नाही. तर मला आज सांगा काय ॲक्शन घेणार.

प्रशांत केळुसकर :-

स्प्रिंग वैगेरे चालते ती पूर्ण रस्त्यावर उडते गाड्या पूर्ण रोडवर असतात. तिथे नॅरो रोड आहे. तिथे पूर्ण ट्राफिक होते. गॅरेजवाल्यावर कारवाई करायला लावा.

मा. सभापती :-

स्टॅन्डिंगची मिटींग असताना सर्व प्रभाग अधिकारी येथे हजर पाहिजे. कारण प्रत्येकाचे वेगवेगळे विषय असतात. सभा चालू व्हायच्या अगोदरच बोलवून घ्या.

स्टिवन मेन्डोंसा :-

प्रभाग अधिकारी पाहिजेच ना. कोणाच्या समस्या असतील तर कुठे जाणार.

दिनेश जैन :-

मा. सभापती साहेब माझा एक विषय आहे. आदर्श वॉर्ड बनवण्यासाठी मिरा भाईंदरमध्ये तरतूद ठेवली होती की एक आदर्श वॉर्ड बनवू आणि लोकांना दाखवू त्याच्यासाठी तरतूद ठेवली आहे ते काम किती झाले त्याची मला माहिती पाहिजे.

दिपक खांबित :-

आदर्श वॉर्डसाठी कन्सल्टंट नेमण्यासाठी महासभेने ठराव केला होता त्याप्रमाणे ४-५ वेळा टेंडर काढले परंतु कोणीही कन्सल्टंट आले नाही. बिच में क्या हो गया की शांतीनगर के जो भी रस्ते है वो टी.डी.आर के माध्यम से डेव्हलप करने के लिए विकासकने अपने पास लेटर दिया है। मेरे को टी.डी.आर. दो मैं आप को कॉंक्रीट बनाके देता हूँ।

दिनेश जैन :-

विकासक वो काम कर सकता है क्या?

दिपक खांबित :-

वही सब चालू है।

दिनेश जैन :-

विकासक वो काम करके हम उसको टी.डी.आर दे सकते है क्या शांतीनगर मैं।

दिपक खांबित :-

हा ऐसे हमको टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटने दिया है की जो भी खर्चा होगा उसका टी.डी.आर दे सकते है। जो भी रस्ते है विकासक को बोला है। उसका सर्व्हे करके डिझाइन करके हमको दो तो हम लोग परमिशन देंगे वो प्रोसेस शुरु है। टाऊन प्लानिंग ने हमको दिया है जो खर्चा करेगा.................

दिनेश जैन :-

शांतीनगर का जो भी रस्ते है वो उन्होंने महानगरपालिका को हॅन्ड ओव्हर किया है वो रस्ते पे आप उनको टी.डी.आर. दे सकते है क्या?

दिपक खांबित :-

दे सकते है हमको टाऊन प्लानिंगने रिपोर्ट दिया है।

दिनेश जैन :-

उसका सारा प्रोसीजर बिल्डरने क्लियर किया है। उसका टी.डी.आर ले सकता है क्या वो।

दिपक खांबित :-

७/१२ उतारे सब प्रोसीजर शुरु है। नाम पे करने का।

दिनेश जैन :-

तो वो होने के बाद में उसको दो साल लगेगा तो अपना आदर्श वॉर्ड का योजना उसके पिछे क्यों लटकाने का अपना तरतूद पडा हुआ है।

दिपक खांबित :-

तरतूद है लेकिन फ्रि में मिलता खर्चा बचता है। वो छोडके बाकी कुछ काम है तो आप सजेस्ट किजीए। आदर्श वॉर्ड में तुरंतहम प्रपोजल देते है उसका प्रपोजल दुसरा जो भी रहेगा हम करते है।

दिनेश जैन :-

ठीक है

नरेश पाटील :-

माझ्या वॉर्डात दोन गार्डन आहेत. एक मायरा गिल्बर्ट मेन्डोंसा आणि एक राम रहीम गेली सात महिने वॉचमन मागतो. वॉचमन द्यायला तयार नाही. एकही वॉचमन नाही. ड्रग्ज, चरसी आणि दारु पिणाऱ्यांचा तिकडे अड्डा बनला आहे. मला वॉचमन कधी देणार.

शरद पाटील :-

मा. सभापती साहेब फार चांगला विषय आहे. आपल्याकडे किती सेक्युरिटी आहेत. गार्डनमध्ये राहणारे किती वॉचमन आहेत. आम्हालाच माहित नाही. हा ह्यांचा विषय नाही. माणस जातात कुठे सांगा.

नरेश पाटील :-

तिकडे दारु पिणाऱ्याचे अड्डे बनले आहेत. कौन लाईट बंद करेगा, कौन चालू करेगा। दादागिरी चलता है। मेश्राम बोलतो वॉचमन तुम्ही ठेवा. म्हणजे मी वॉचमन ठेवू. मला वॉचमनची गरज आहे. मेश्राम आणि इरकरला दोघांना बोलवा वॉचमन का देत नाही. पोलिस लोक थकलेले आहेत. रविवारी पाच चरस घेणाऱ्यांना पकडून दिले. ते कधी पण पितात आणि लोक आम्हाला कम्पलेन्ट करतात.

सुहास रकवी :-

मा. सभापती साहेब हा विषय असा आहे की गेल्या स्टॅन्डिंगमध्ये डॉ. राजेंद्र जैन यांनी खरोखरच एक चांगल सोल्यूशन काढल होत की बायोमेट्रीक ठेवायला हवी होती. किती तासाची ड्यूटी हार्वस, त्यांचे एजचे काय, त्यांना युनिफॉर्म देणार, स्मशानात सुध्दा अनिल भोसलेनी सांगितले तो स्मशानाचा सुरक्षारक्षक हलत डूलत होता त्याला काही कळतच नव्हते. म्हणजे हे वॉचमन किंवा सेक्युरिटी अपॉइन्ट केले आहेत. त्यांच्या बायोमॅट्रीकचे पण काही झाले नाही. एक सदस्य असतो तो निघून गेल्यावर तो विषय तिथेच संपतो. त्याचे इम्पलीमेन्टेशन होत नाही. आपले जे दोन उद्यान अधिक्षक आहेत इरकर आणि मेश्राम ह्यांचे फोनच लागत नाही. नगरभवन ते पालिकेपर्यंत जे खड्डे खणले आहेत. वन विभागाच्या सगळ्या गाड्या रस्त्यावर १० वेळा फोन केला तर ते म्हणतात आम्ही ठेवू कुठे? काही ठिकाणी तुम्ही ॲडजस्टमेन्ट करायची की आठ दिवस तिकडे ठेवा. पण हे फोन न उचलता उत्तर न देता सर्व प्रकारची अडवणूक हे अधिकारी करतात. पहिले ह्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा. त्यांना नोटिस काढा की तुम्हाला सदस्य जे काही सांगतात त्याचे निराकारण करा. तुम्ही त्या दोघांना नोटिसा काढा.

नरेश पाटील :-

माझा प्रश्न असा आहे धरम काटा आहे तिकडे जवळजवळ १००-१५० बाईक मेन रोडवर विकायला ठेवल्या आहेत. जे दुकानात जातात त्याच्या बाईक उचलल्या जातात आणि त्या बाईक विकायला ठेवल्या आहेत. त्या का उचलल्या जात नाही. येणारा जो दोन मिनिटासाठी बाईक ठेवतो त्याची बाईक लगेच गूल करतात.

शरद पाटील :-

हे पोलिसांचे आहे असे नाही. हे तुमच्या अतिक्रमण वाल्याला सांगा एखाद छप्पर आहे तर ते लगेच तोडायला जातील. पण ५०० कम्पलेंट केल्या आणि मोठ काम असेल तिकडे जाणार नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत केळुसकर :-

दुकानाच्या बाहेर जर शेड असेल आणि त्याची आपण तक्रार दिली तर आता चाललो, थोड्या वेळाने जातो, पोलिस स्टेशनला आलो आहे. हे प्रकार आपल्याकडे घडतात आणि एखाद्या माणसाने आपल्या घरावर फस्ट फ्लोअरच्या फ्लॅटवर तेवढे शेड बांधले असेल आणि वरुन कचरा पडते काय पडते म्हणून त्यांनी ते बांधले असेल त्यांना ५-५ वेळा नोटिस देऊन मोकळे होतात. घरात राहणाऱ्या माणसाला त्या शेडमुळे कोणाला प्रॉब्लेम होत नाही.

दिनेश जैन :-

आपण पुराव्यासकट दिले की हे इलिगल काम चालू आहे तरी त्याच्यावर कारवाई करत नाही. आणि आपल्याला जबाबपण देत नाही. ज्यांनी कोणी परवानगी दिलेली असते त्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई नाही नगरपालिकेने बिल्डरवर कोणती कारवाई नाही आणि आपल्या नगरसेवकांवर ते कारवाई करतात. असे करायचे नाही तसे करायचे नाही.

प्रशांत केळुसकर :-

प्रभाग अधिकारी काम करत नाही त्याचे पूर्ण खापर अतिक्रमणचा कारभार दिला आहे त्याच्यावर फोडले जाते.

जयंतीलाल पाटील :-

साहेब माझ्या प्रभागामध्ये मेन रोडला सर्व्हिसिंग केली जाते. लोकांना त्रास होतो. मी शिरवळकर साहेबांना १० वेळा कम्पलेन्ट करुन देखील अजूनपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.

प्रशांत केळुसकर :-

सन्मा. सदस्य आपण प्रभागातली गोष्ट करता मिरारोडच्या मेन सर्कलवर गोल्डन नेस्ट सर्कलमध्ये शौचालयाच्या बाजूला जे गॅरेज होत तिकडे ह्यांचे लक्ष नव्हते.

मा. सभापती :-

मा. आयुक्त साहेब आता जेवढ्या सन्मा. सदस्यांनी विषय मांडले ह्या सर्व विषयाचा पुढच्यासभेला कारवाई पाहिजे.

प्रशांत केळुसकर :-

सध्या गोल्डन नेस्ट सर्कलचा भाग आहे ते नगरपालिकेचे आरक्षण आहे. तिथे अतिक्रमण झाले आहे नाही होत तर ते काढा. बाकीच्या टाईमाला तुम्हाला बरोबर पोलिस प्रोटेक्शन मिळते ह्या टाईमाला मिळत नाही.

दिनेश जैन :-

ज्या नगरसेवकांनी कम्पलेन्ट दिलेली असेल त्या नगरसेवकांना काय कारवाई केली ते कळवा की आम्ही ही कारवाई केली आहे. आमच्या ऑफिसरवर ही कारवाई केलेली आहे. ह्यांनी खोटे काम केलेले आहे ह्या बिल्डरने खोटे काम केलेले आहे ते आम्हाला कळवा नाही केले असेल आणि आम्ही खोटे केले असेल तर आम्हाला कळवा.

शरद पाटील :-

लिखीतमध्ये कळवा.

स्टिवन मेन्डोंसा :-

बोल रहे है ना वो सही है नगरसेवक को झूटा ठहराते है। काम होनेवाला है वो होता है।

प्रशांत केळुसकर :-

आमच्या प्रभागात असा विषय आहे. मी आणि मुन्ना सिंह आम्ही दोघ एकमेकांच्या प्रभागाला लागून आहोत. आमच्या इकडे नर्मदा महादेव गार्डन आहे. लोकांना सुविधा व्हावी म्हणून एक रोड काढतो लोकांना जाण्या येण्यासाठी रस्ता नाही. एकदा जर तिथे बस आली तर रिक्शावाला जाऊ शकत नाही. दोन रिक्शा आली तर शाळेची बस अडकली. माणसाने तिकडून रहदारी करणे खूप जिकरीचे काम आहे. ह्यासाठी महानगरपालिकेने तिकडे रस्ता केला त्या रस्त्यावर तिकडे काही आहेत म्हणजे समाजकंटक म्हणा किंवा ज्या लोकांना चांगली काम बघवत नाहीत अशा समाज उन्नतीच्या नावावर मिरवणारी लोक आहेत त्या त्याच्यावर एलिगेशन केले ते म्हणतात ह्या लोकांनी गार्डन खाल्ल स्थानिक नगरसेवकांनी गार्डन खाल्ल आणि बिल्डरला मिळून हा रोड काढतात. त्याच्या फायद्यासाठी काढतात असे करतात तिथे होणार कारवाई त्या लोकांना फेस कराना. आम्हाला तिथे जाव लागते आम्ही दोन्ही बाजूने मरतो ना. आमचे कसे असते आम्ही गार्डन पण वापरायचे रोड पण बनवायचा ह्या दोन्ही गोष्टी करायच्या त्या करताना आम्हाला जिकरीचे होते. अधिकारी उत्तर द्यायला बांधील नाहीत का? जनतेच्या सुविधेसाठी तो रोड बनवतो.

दिनेश जैन :-

अधिकारी बोलतात काय होत नाही असे १७५६ नगरसेवक येतात.

प्रशांत केळुसकर :-

सन्मा. सदस्य मुन्ना सिंह ह्यांनी मेहनत करुन ते गार्डन बांधलेले आहे.

सुहास रकवी :-

बाजाराच्याइकडे हातगाडीवाल्यांना उठवायला गेलो तर १००० रुपये हफ्ता घेतात. आता महिना १००० रु. आपल्याला कमी पडायला लागले. म्हणजे लोक इलिगेशन करायला काही मागेपुढे बघत नाही. आता हे म्हणतात समाजकंटक म्हणजे स्वःही करायचे नाही आणि दुसऱ्यालाही करुन द्यायचे नाही. अशा प्रवृत्ती वाढल्या आहेत. इकडचे बाजार म्हणा किंवा अशी जी लोक आहेत साहेब त्यांना तोंड दिले ना तर अमच्या सदस्यांना समोर जाण्याची गरज लागणार नाही. काय होते नरेश पाटीलचे ऑब्जेक्शन आहे ना. नरेश पाटील को जाके मिलके आ।

प्रशांत केळुसकर :-

आम्ही केलेली तक्रार गोपनीय ठेवायची असते.

(सभागृहात गोंधळ)

वेंचर मेन्डोंसा :-

नयना मॅडम पण कशा बळी पडल्या त्यांच्यावर आरोप करुन आतमध्ये केल. तिच्यावर केस केली. त्या चांगल काम करत होत्या ह्यांनी त्यांना फसवले...........

प्रशांत केळुसकर :-

मागच्या ३-४ दिवसापूर्वीची गोष्ट आहे. पक्षाच्या ऑफिसचे काम चालू होते. आपल्या आर.जी.वर ऑफिस बांधतात कुरळेकर साहेब असतील इकडे मा. महापौर मॅडमनी ३-४ वेळा सांगितले आताच काम चालू आहे. आताच थांबवून घ्या उदया झाल तर तुम्हाला करता येणार नाही. मा. महापौर मॅडमनी कुरळेकर साहेबांना सांगितले एक काम करूया आपणच त्या ऑफिसचे उद्घाटन करू या. म्हणजे आपल्या अधिका-याच हलगर्जीपण चालला आहे. आता जयंतीच्या किंवा आमगावकराच्या वॉर्डमध्ये कॉर्नरला तिथे स्मशानाच्या बाजूला तिथे त्या जागेवर एक स्टॉल होता त्या स्टॉलला तिकडून ३ वेळा उचलले परत तो स्टॉल तिथे येतो मग आपल्या अधिकाऱ्यांचे त्याच्यावर काय वर्चस्व राहीले आहे.

मा. सभापती :-

माझ्या वॉर्डामध्ये आहे मी स्वतः सदस्य असताना कारवाई करायला आलो होतो कारवाई करतच नाही.

(सभागृहात गोंधळ)

सुहास रकवी :-

मला विषयच समजत नाही समोर चप्पलवाला आहे त्याच्या समोर पण चप्पलवाला.....................

प्रशांत केळुसकर :-

परवानगी पण घेत नाहीत.

सुहास रकवी :-

किती अंतरावर द्यायचे.

प्रशांत केळुसकर :-

१०० फूटाच्या अंतरावर

शरद पाटील :-

मा. सभापतीसाहेब आता नगरसेवकांच्या तक्रारी तुम्ही एकल्या. आम्हाला खर म्हणजे तक्रार करायची गरजच नाही. तुम्हाला आम्ही सांगतो छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरून तिकडे एवढया गाडया लागल्या आहेत त्या आपण उचलत नाही. तेच तुम्ही करत नाही मी प्रत्येक वेळेला बोलतो तुम्ही आतल सोडून द्या. जे आपल्या शहराचे नाक आहे छत्रपती शिवाजी महाराज मार्ग सांगा आता तुम्हाला किती फेरीवाले दाखवू आता सुध्दा संध्याकाळची गोष्ट सोडा ही काय तक्रार करायची गोष्ट आहे तुम्ही पण येत जात असताना.

प्रशांत केळुसकर :-

सर्व्हिस रोड बोलतो तिकडे केवढया बाईक लागलेल्या असतात.

(सभागृहात गोंधळ)

शरद पाटील :-

प्रशासन नगरसेवकावर आरोप करते. हे सांगायला येतात त्यांचा जॅक ते लावतात. साहेब जे नगरसेवक असतील त्यांचे नाव तुम्ही डिक्लेयर करा.

प्रशांत केळुसकर :-

तुम्ही त्याला डिसकॉलिफाईड करा आम्ही तयार आहोत. आमच्या नगरसेवकांनी ह्याबाबतीत तक्रारी करायला गेल्या तुम्ही कारवाई करत नाही म्हणून आम्ही कारवाई करायला जातो. आमच्या नगरसेवकांवर गुन्हे दाखल होतात. सन्मा. नगरसेवक रवि व्यास ह्याच्यावर गुन्हा दाखल झाला.

नरेश पाटील :-

गोल्डन नेस्ट सर्कलला किती फर्निचरवाले गेली दोन वर्ष आम्ही तक्रार करतो काही ॲक्शन नाही. गेली दोन वर्ष स्टॅन्डिंगमध्ये बोलतो काही ॲक्शन झाली नाही.

शरद पाटील :-

सगळ्यात मोठा मुद्दा म्हणजे साहेब मंदिर बांधले ना तर त्या मंदिरावर रोज गाडी ही आपल्या अधिकाऱ्याची परिस्थिती आहे.

मर्लिन डिसा :-

मा. सभापती साहेब माझी एक रिक्वेस्ट आहे जे पण मेन रोड आहेत .............

शरद पाटील :-

सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना इथे बोलवा. पुढच्या वेळेला अधिकारी नसतील तर आम्ही सभा चालवणार नाही.

प्रशांत केळुसकर :-

आमच्यावर खोटे आरोप करुन गुन्हे दाखल होत असतील. मग ह्या प्रभाग अधिकारीच कामच काय? तुम्ही कशाला जाता आम्हीच जाऊ.

विजय म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-

१० तारखेला सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. मा. महासभा आणि स्टॅन्डिंगला उपस्थित राहायचे आज कोण उपस्थित राहीले नसेल तर त्यांना शोकस नोटिस देतो.

मर्लिन डिसा :-

प्रत्येक मेन रोडवर एस.के.स्टोन ते मिरारोड स्टेशन मेनरोड आहे. त्याच्या आजूबाजूला जेवढ्या सोसायटी आहेत ग्रिनफिल्ड, सिमला कॉम्पलेक्स, वूडलॅन्ड, वर्षा टॉवर, सिध्दार्थ नगर हे सगळे जे आहेत ह्या सगळ्या सोसायटीच्या बाजूला लागून एक मोठ गटार जात होत ते बंद केल आता तिकडे स्लॅब टाकले आहेत. त्या स्लॅबपर्यंत दुकानवाल्यांनी एक्सस्टेन केलेले आहे लोकांनी चालायचे कुठे? काही ॲक्शन घेत नाही. ओरली सांगितले तर काहीच ॲक्शन घेत नाही. सोसायटीवाले बोलते है मॅडम लिखके दो हम मोर्चा लेके आऐंगे। त्यांना मोर्चासाठी यायचे म्हणजे सुट्टी काढावी लागते. आपल्या अधिकाऱ्यांना दिसत नाही का की, तिथे अतिक्रमण झालेले आहे एम.टी.एन.एलला रोडला सुध्दा ............

स्टिवन मेन्डोंसा :-

काशिमिरा रोडवर जो शिवाजीचा पूतळा बसवला आहे. तिथे गाड्या पुढेपर्यंत लागतात म्हणजे टर्निंग फुटपाथ आहे त्याच्यावर दुकानवाले खुर्च्या टाकतात. सरळ-सरळ फुटपाथवर धंदा करुन बसतात तिकडे तुम्ही कधीपर्यंत कारवाई करणार?

जयंतीलाल पाटील :-

जी.सी.सी.च्या अपोझिटला पावभाजी, आमलेट पावच्या गाड्या लागल्या आहेत त्या हायवेला कशा लावल्या आहेत.

प्रशांत केळुसकर :-

त्यांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही मिरा भाईंदरचे नाक सर्वांची शान छत्रपती शिवाजी महाराज मार्ग आम्हाला कधी क्लिअर करुन दाखवता.

दिनेश जैन :-

मा. आयुक्त साहेबांनी ऑर्डर दिलेली आहे. माझ्या प्रभागामध्ये शांती स्टार बिल्डरच्या इथे काम चालू आहे. ते थोडे दिवस थांबवावे तरी ते मा. आयुक्तांचे ऐकत नाही. आणि काम चालू आहे. तर आमचे काय ऐकणार.

विजय म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-

काल ह्या संदर्भात आपण ज्या वेळेला आलेला होता त्यावेळी समोरच्या समोर सुचना दिल्या आहेत. आठवड्याभरामध्ये बोलवून नंतर टाऊन प्लानिंग अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन मग माहिती देण्यात येईल. खेत्रे साहेब सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे मेन रोड बद्दल जी दोन पथक केली आहेत त्या दोन पथकाचे काम कसे चालले आहे. आठवड्याभरात काम पूर्ण करुन घ्या.

प्रशांत केळुसकर :-

माझ्या माहितीप्रमाणे आपण त्याच्यासाठी २५ की ५० जणांचा स्कॉड घेतला आहे. बाऊन्सर सारखे बाऊन्सर घेतले आहेत ते आपण सत्यनारायणाच्या पूजेला बसवायला घेतले आहेत का? बाऊन्सर घेतले आहेत तर ते आहेत कुठे?

दादासाहेब खेत्रे :-

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बोलतो मिरा भाईंदरमध्ये फेरिवाल्यावर कारवाई करण्यासाठी १८ तारखेच्या महासभेतील मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मा. आयुक्त महोदयांनी दोन पथक तयार केले. भाईंदर ईस्टसाठी १-२-३ आणि ४-५-६ साठी असे दोन स्कॉड तयार केले ह्या स्कॉडमार्फत त्या-त्या प्रभागात कारवाई केली जाते. आतापर्यंत मा. सदस्य रवि व्यास साहेब आणि मा. महापौर मॅडनी वेळोवेळी बोलवून शिवसेना गल्लीबाबत नेहमी तक्रार होती शिवसेना गल्लीमध्ये लागणाऱ्या फेरिवाल्यांना आम्ही विरोध करीत होतो. म्हणून त्यांच्यावर ३५३,१८१,१३४ प्रभाग अधिकारीमार्फत गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच प्रभाग ५ मध्ये सुध्दा सेक्टर १,२,३ ह्याबाबत जी तक्रार होती ती सुध्दा कन्टीन्यूटीमध्ये कारवाई ठेवून तिकडच्या फेरिवाल्यावर जे विरोध करतात त्याच्यावर सुध्दा १८१,३५३ प्रमाणे प्रभाग अधिकारीमार्फत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. प्रभाग ५ मध्ये मी स्वतः दररोज संध्याकाळी ८.०० वाजेपर्यंत तिथे थांबून करतो आणि शिवसेना गल्लीतसुध्दा प्रभाग अधिकारी प्रभाग क्र. ०१ आणि ०२ आणि ते पथक त्यांची सुध्दा कारवाई चालू असते. मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन प्रत्येक दोन पथकामध्ये ४० बाऊन्सर मिळालेले आहेत. प्रभाग १,२,३ साठी २० बाऊन्सर मिळालेले आहेत आणि प्रभाग ४,५,६ साठी २० बाऊन्सर मिळालेले आहेत. दोन्हीकडे असे डिव्हाईड करुन कारवाई प्रस्थापित केलेली आहे. मा. पाटील साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे गोल्डन नेस्ट सर्कलमध्ये आम्ही बऱ्याच वेळा कारवाई केली साहेबांना सुध्दा माहित आहे. मी स्वतः प्रभाग क्र. ५ मध्ये असताना मी लोकांचे सामान जप्त केलेले आहे ते सामान आम्ही तोडले प्रत्येक ठिकाणी कारवाई करतो पण परंतु मा. सदस्यांना अशी विनंती करतो. मा. हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे जे १ मे २०१४ पूर्वीचे फेरिवाले बसलेले आहेत त्यांना हटवणे असा मा. न्यायालयाचा आदेश आहे त्यासाठी आपल्याला एक समिती स्थापन करायची आहे. त्या समितीच्या अनुषंगाने पुढील कारवाई करायची आहे. मा. आयुक्तांच्या आदेशाने मा. उपायुक्त, मा. उपायुक्त अतिक्रमण विभाग ह्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही वेळोवेळी फेरिवाल्यावर कारवाई करत आहोत.

प्रशांत केळुसकर :-

१ मे २०१४ हा आदेश कधी प्राप्त झाला. २०१४ लाच प्राप्त झाला असेल.

दादासाहेब खेत्रे :-

नाही त्याच्यानंतर आला.

प्रशांत केळुसकर :-

एक महिन्यानंतर मग आता आला असेल म्हणजे त्या वर्षातील १५ दिवस पहिले मग १५ दिवस पहिले बसलेल्या माणसावर कारवाई करायची ती नोंद तुमच्याकडे आहे.

शरद पाटील :-

२०१४ पासून कोण बसते ते तरी सांगा. तुम्हाला माहिती आहे का?

दादासाहेब खेत्रे :-

आपल्याकडे पूर्ण मिरा भाईंदरचा २००८-०९ ला सर्व्हे केलेला आहे.

मुन्ना सिंग :-

सर्व्हे का कॉपी दो।

शरद पाटील :-

२००८-०९ ला सर्व्हे केला त्याची कॉपी द्या. किती फेरिवाले बसले होते ते बघू द्या. आणि आता किती फेरिवाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज मार्गाचे अजून बोललात नाही ३-४ मध्ये कुठे कारवाई होते ते सुध्दा बोलले नाहीत ५ आणि ६ चे बोलले. ३-४ मध्ये कुठेच कारवाई होत नाही का होत नाही?

दादासाहेब खेत्रे :-

सर आज ३ दिवसांपासून केबीन रोडला..........

शरद पाटील :-

तो केबीन रोड तेवढा एकच घेतला तुम्ही.

दादासाहेब खेत्रे :-

मा. सदस्यांच्या तक्रारी असतात.

शरद पाटील :-

आम्ही तक्रारी केल्यावर आमच्यावर केसेस होतात. आम्ही तक्रारी का करायच्या? तुम्ही पगार कसला घेता. तुम्ही डिपार्टमेंट कॅन्सल करा.

दादासाहेब खेत्रे :-

फेरिवाल्यांनी आमच्यावर पण विनयभंगाच्या केसेस केल्या.

शरद पाटील :-

तुम्ही सरकारी कर्मचारी आहेत तुम्ही सांगा ना काय होते काय नाही होत ते. आम्ही पण मान्य करतो तुमच्यावर कोणत्या केसेस केल्या आहेत. मला एक सांगा छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर कोणाची तक्रार येण्याची वाट बघता.

दादासाहेब खेत्रे :-

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर कशीमिरा नाक्यावर गाड्या जास्त पार्किंग होतात त्याच्यामुळे ट्राफीक होते.

शरद पाटील :-

गाड्या पार्किंग होते ती गोष्ट नाही. तुम्हाला फेरिवाले बसलेले दाखवले तर तुम्ही काय कराल.

(सभागृहात गोंधळ)

दादासाहेब खेत्रे :-

तिकडे जास्त फेरिवाले नसतील.

शरद पाटील :-

जास्त कमी नाही. आम्हाला तिकडे एकही फेरिवाला नको तिकडे.

(सभागृहात गोंधळ)

सुहास रकवी :-

त्यांनी विषय काय मांडला मे २०१४ ला हायकोर्टाने आदेश दिले. त्यांनी असा आदेश दिला का की ना फेरिवाले झोनमध्ये सर्वांनी बसा सगळ्यांनी धंदा करा असा आदेश आहे. तो आदेश वाचा. तुम्हाला आदेश अशासाठी दिले आहेत की २०१४ त्याच्याआधी २००९ ला सर्व्हे केला तेवढे ठेवा बाकी हटवा.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत केळुसकर :-

सर्वांत महत्वाची गोष्ट तुम्हाला हायवे क्लिअर ठेवायचा आहे. हायवेवर कोणत्याही प्रकारचा फेरिवाला नाही पाहिजे.

शरद पाटील :-

मा. सभापती साहेब आम्हाला रुलिंग पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा दोन दिवसात क्लियर झाला पाहिजे.

सुहास रकवी :-

बाऊन्सर आहेत म्हणतात त्याचा पगार तर रोज चालू आहे ना मग रोज कारवाई का नाही?

(सभागृहात गोंधळ)

मर्लिन डिसा :-

मा. सभापती साहेब स्टेशन रोडवर प्रायव्हेट बसेस पार्किंग असतात. मच्छी मार्केट आणि फेरिवाले त्याच्यामुळे ट्राफीक जाम तर लोकांनी चालायचे कुठून ते सांगा.

शरद पाटील :-

मॅडम मी काय सांगतो ह्यांना १-१ दिवस द्या एक दिवसात छत्रपती शिवाजी महाराज मार्ग क्लिअर करा.

नरेश पाटील :-

मा. सभापती महोदय माझ्या वॉर्डमध्ये सर्वोदय कॉम्पलेक्सच्या बाजूला व्हाईन शॉप आहे त्याच्या बाजूला अंड्याची भूर्जीवाला, चण्याच्या पिडीवाला याच्यामुळे सर्व कॉटर घेऊन बाजूला बसतात.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत केळुसकर :-

गोल्डन नेस्ट सर्कलला टॉवर्सचे काम चालू आहे. टॉवर्सचे काम चालू असल्यामुळे तिकडे ट्राफीक खूप होते. त्यामुळे गॅरेज वगैरे ते काढून टाका डोक्याला त्रास कशाला ठेवायचा.

(सभागृहात गोंधळ)

सुहास रकवी :-

खेत्रे साहेब मॅक्सेस मॉलच्या बाजूला आतमध्ये आलेना............

(सभागृहात गोंधळ)

जयंतीलाल पाटील :-

खेत्रेसाहेब आपण बाऊन्सर घेऊन किती महिने झाले.

दादासाहेब खेत्रे :-

५-६ महिने झाले.

मोहन जाधव :-

तुम्ही ३-४ प्रभागात बोललात त्याच्यात तुम्हाला केबीन रोडच दिवसाला तो नवघर रोड अख्खा भरलेला आहे. लोकांना चालायला येत नाही................

दादासाहेब खेत्रे :-

आम्ही कारवाई करतो.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत केळुसकर :-

१-२-३ ला २० जण दिली आहेत आणि ४-५-६ ला २० जण दिली आहेत. ते २० जण वेस्टवरुन इस्टला कधी येणार? प्रभाग क्र. ३ ईस्टला आहे. आपल्या माहितीप्रमाणे सांगतो ईस्टला जो प्रभाग आहे तर ती माणस इकडे १५ करा तिथे माणसे वाढवा.

वेंचर मेन्डोसा :-

प्रभाग ६ ला २० माणसाचे स्कॉड दिले पाहिजे.

प्रशांत केळुसकर :-

वेस्टचा प्रभाग १ आणि २ आहे. राई, मोरवा, मुर्धा मी सांगतो तुम्ही चुकून पण सुभाषचंद्र मैदानाच्या पुढे जात नाही.

मा. सभापती :-

सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना मांडल्या आहेत त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. आणि दोन दिवसात मला त्याची पूर्ण माहिती पाहिजे.

मुन्ना सिंग :-

२००९ का फेरिवाले का मेरे को लिस्ट चाहिए।

मा. सभापती :-

२००९ पूर्वीचे फेरिवाले आहेत त्यांची पूर्ण लिस्ट पाहिजे.

मुन्ना सिंग :-

कौनसा भी लिस्ट दिखाऐंगे वो नही चलता वो लिस्ट मेरे को कब देंगे।

दादासाहेब खेत्रे :-

जमा करके देना पडेगा हर एक प्रभाग में है।

मुन्ना सिंग :-

आप कैसे बोल रहे हो की सब लिस्ट आपने अपने आँखो से देखा था क्या की सब लिस्ट है।

दादासाहेब खेत्रे :-

जब में प्रभाग अधिकारी था तब सर्व्हे हुआ था। फोटो के साथ फेरिवाले का सर्व्हे किया था।

प्रशांत केळुसकर :-

सन्मा. सदस्यांनी आता सांगितले की लिस्ट आहे. आहे ह्याचा अर्थ काय की मी कुठेतरी ठेवली आहे. मग ती द्यायला १०-१५ दिवस का लावतात?

दादासाहेब खेत्रे :-

त्या-त्या प्रभागात आहेत.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत केळुसकर :-

६ प्रभाग अधिकाऱ्यांना फोन करा आणि आजच्या आज लिस्ट मागवा.

दादासाहेब खेत्रे :-

सर्व प्रभाग अधिकारी कोकण भवनला गेले आहेत.

विजय म्हसाळ (मा. उपायुक्त (मु.)) :-

प्रभाग अधिकारी ह्या वेळेस मिटींगला का आले नाहीत त्याचा खुलासा आपण मागवू आणि पुढच्या वेळेस कुठल्या कुठल्या प्रभागात कारवाई होते त्याचे व्हिडियो शुटींग पण करा आणि डॉक्युमेन्टेशन व्यवस्थित करा आणि यादी एकत्रीत करुन सर्व सन्मा. सदस्यांना द्या.

(सभागृहात गोंधळ)

वेंचर मेन्डोंसा :-

पूर्ण भाईंदरमध्ये नो एन्ट्रीचे बोर्ड तुटले आहेत तर नविन बोर्ड लावण्याची सोय करा.

मर्लिन डिसा :-

मा. सभापती साहेब जर त्या विकासकाने गार्डन बनवून पब्लिकला समर्पण नाही केले तर आपल्या पालिकेने ते हस्तांतर करुन घ्यायचे. उद्या आणि परवाचे दोन दिवस आहेत. मा. आयुक्तांनी दोन महिन्या अगोदर दोन महिन्यांची वॉर्निंग दिली होती. तुम्हाला दोन महिने देतो प्रत्येक आयुक्तांना गेली २५-२६ वर्ष हेच उत्तर द्यायचे मी बनवून देणार आजपर्यंत त्यांनी केले नाही.

सुहास रकवी :-

बिल्डर आता हॅन्डओव्हर करुन देत नाही.

मर्लिन डिसा :-

जी बॅरीकेट लावून ठेवली आहे. हॅन्डओव्हर करुन देत नाही आणि डैव्हलप पण करुन देत नाही. त्याच्यात मुलांना खेळायला पण देत नाही. स्वतःची प्रॅापर्टी समजून ठेवली आहे. मी गेली साडे आठ वर्षापासुन पाहते सुनावणी होतात. मला सुनावणी नको. मला सुधारणा पाहिजे.

राजेंद्र पांगळ :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो शितलनगर घर संकुलन मधील जे आर.जी. आहेत त्या जागा मोकळ्या करुन डेव्हलप करण्यासाठी आपण संबंधीत डेव्हलपरला बोलावले होते त्याची आता हेयरींग झाली त्याला नोटिस पण दिली आहे. त्यांनी जागा मोकळी करुन प्लेन ग्राऊंड करुन आपल्याला लेखी पत्र पण दिलेले आहे. आपल्या मागणीप्रमाणे ते गार्डन डेव्हलप करायचे आहे त्याला आज पत्र देऊन टाकू.

सुहास रकवी :-

त्याने लेखी दिले आहे मग पजेशन त्याचेच आहे ना.

राजेंद्र पांगळ :-

पजेशन त्याचेच आहे.

मर्लिन डिसा :-

मी तुम्हाला सांगते त्यांनी नाही केले. ते पालिकेने केले आहे. सफाई पण वृक्ष प्राधिकरण डिपार्टमेंट करत आहे.

राजेंद्र पांगळ :-

प्लेन केलेले आहे.

वेंचर मेन्डोंसा :-

प्लेन करुन त्याच्यावर खेळणी पण लावली आहेत. त्याच्यातून फंडपण लागलेले आहेत.

मर्लिन डिसा :-

शिवमूर्ती नाईक साहेबांनी २०१० मध्ये करुन दिलेले आहे. बाकीचे अजून बाकी आहे.

वेंचर मेन्डोंसा :-

सगळ झालेले आहे. लहान मूलांची खेळणी पण झालेली आहेत. पंप हाऊस पण झालेले आहे. त्याच्यात पोलिस स्टेशन पण केलेले आहे. मॅडम बोलतात ते मागच्या बाजूचे आहे.

मर्लिन डिसा :-

एक शाळेने डेव्हलप केलेले आहे आणि ७३२ जे देना बँकच्या बाजूला आहे जे गाबेज होते ते परवा हेयरिंग झाल्यानंतर महासभेत सांगितल्यावर पालिकेची माणसे लावून सफाई झालेली आहे. आणि मंदिराच्या बाजूला बारीकडे लावून बंद करुन ठेवले आहे. आणि मुलांना खेळायला देत नाही तर ते हस्तांतर करुन घ्या.

शर्मिला बगाजी :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते मला खेत्रे साहेबांशी बोलायचे आहे. २६ तारखेला चारच्या सुमारास उत्तनमध्ये मारामाऱ्या झाल्या. तुम्हाला बहुतेक मा. आयुक्त साहेबांचा फोन आलेला आणि एस.पी. बावचेजी ह्यांचा पण फोन आलेला. त्या ठिकाणी तुम्ही जाऊन आलात. त्या ठिकाणचे अतिक्रमण काढायचे की नाही त्याबद्दल खुलासा करा.

दादासाहेब खेत्रे :-

मा. आयुक्त महोदय ह्यांनी मला २६ तारखेला ६.३० वाजता फोन केलेला की तुम्ही बावचे साहेबांना फोन करुन काय झाले ते बघा. मी मा. बावचे साहेबांना फोन केला होता. त्यानंतर बावचे साहेब बोलले तुम्ही सागरी उत्तन पोलिस स्टेशनला या मी जगदाळे साहेबांना घेऊन सागरी उत्तन पोलिस स्टेशनला गेलो होतो. तिकडे बरीच लोक होती त्यांनी त्यांच्या पध्दतीने प्रकरण हॅन्डल केले होते. मला बोलले आता आम्ही प्रॉब्लेम सॉल्व्ह केला आहे आता काय प्रॉब्लेम नाही.

शर्मिला बगाजी :-

तिथे गणेश विर्सजनसाठी जे पाईप टाकतो त्याच्यावर त्यांनी भराव टाकून बनवलेल होत तर आपल्याला भरणी कढायची आहे त्याची ऑर्डर अधिकाऱ्यांना द्यायला लागेल तर अधिकारी सांगतात............

दादासाहेब खेत्रे :-

मला त्याच्याबद्दल कल्पना नाही.

शर्मिला बगाजी :-

ते राणे साहेबांना सांगायला पाहिजे. मी रिक्वेस्ट करते जेव्हा स्थायी समितीची मिटींग असते तेव्हा सर्व प्रभाग अधिकारी पाहिजेत कारण प्रत्येक वेळेला अतिक्रमणचा विषय असतोच.

नगरसचिव :-

सन्मा. सदस्य प्रभाकर म्हात्रे, श्री. परशुराम म्हात्रे तसेच सौ. मंदाकिणी गावंड ह्यांचे वडील पद्माकर म्हात्रे ह्यांचे १९ तारखेला निधन झाले त्यांना श्रध्दांजली वाहायची आहे.

मा. सभापती :-

सभा संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दु. १२.३५ वाजता.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

